# उपयोजित मराठी

## ( डॉ. गं. ना. जोगळेकर कृतज्ञताग्रंथ )

संपादक
डॉ. केतकी मोडक, संतोष शेणई, सुजाता शेणई

पद्मगंधा प्रकाशन, पुणे
ISBN ९७८-९३-८२१६-१८-९

## लेखनविषयक नियम

ही नियमावली स्वतंत्र सुट्या शब्दांच्या लेखनापुरतीच मर्यादित आहे. पण प्रत्यक्ष लेखनव्यवहारामध्ये हे शब्द वाक्यांमध्ये वापरले जात असतात. म्हणून व्याक्यांच्या लेखनाचे नियम, रुपसिद्धीचे नियम आणि वाक्यरचनेतील सुसंवादाचे नियम विचारात घेणे लेखनाच्या दृष्टीने आवश्यक आहे. प्रस्तुत ठिकाणी काही महत्वाच्या बाबींचा विचार केला आहे. येथे अठरा नियम जसेच्या तसे न घेता ते गरजेप्रमाणे संक्षिप्त आणि विस्तारित केले आहेत.

# अनुस्वार

## नियम-१

१. स्पष्टोच्चारित अनुनासिकाबद्दल शीर्षबिंदू ध्यावा.
उदा. गुलकंद, चिंच, तंटा, निबंध, आंबा.

२. तत्सम शब्दातील अनुनासिकाबद्दल विकल्पनाने पर- सवर्ण लिहिण्यास हरकत नाही.मात्र अशा वेळी अनुस्वारानंतर येणाऱ्या अक्षराच्या वर्गातील अनुनासिकच पर- सवर्ण म्हणून वापरावे.
उदा. पंकज – पकज, पंचानन- पाञ्चातन, पंडित –पण्डित, अंतर्गत-अन्तर्गत, अंबुज – अम्बुज.

३. परसवर्ण लिहिण्याची सवलत फक्त तत्सम शब्दांपुरती मर्यादित आहे.
मूळ मराठी शब्द शीर्षबिंदू (अनुस्वार) देऊनच लिहावेत.
उदा.- तांबे, खंत, संप हे शब्द ‘ताम्बे, खन्त, सम्प’ असे लिहू नयेत.

४. अर्थभेद स्पष्ट करण्यासठी कधीकधी परसवर्ण जोडून शब्द लिहिणे योग्य ठरते.
उदा : वेदांत = वेदांमध्ये, वेदान्त = ( वेदातील ) तत्वज्ञान ;
देहांत = शरीरांमध्ये , देहान्त = मृत्यू.

## नियम २ :-

१. य्, र्, ल्, व्, श्, ष्, स्, ह् यांच्यापूर्वी येणाऱ्या अनुस्वाराबद्दल केवळ शीर्षबिंदू द्यावा.
उदा. सिंह, सयमं, मांस, संहार हे शब्द ‘ सिंव्ह, संय्यम, मांव्य, संव्हार’ असे लिहू नयेत.

२. ‘ज्ञ’ पूर्वीचा नासोच्चारही शीर्षबिंदूने दाखवावा. उदारणार्थ : संज्ञा

## नियम :- ३

१. नामांच्या व सर्वनामांच्या अनेकवचनी सामान्यरूपावर विभक्तीप्रत्यय व शब्दयोगी अव्यय लावताना अनुस्वार ध्यावा.

उदा. लोकांना, मुलांनी, तुम्हांस, लोकांसमोर, घरांत.

२. आदरार्थी बहुवचनाच्या वेळीस असा अनुस्वार दिला पाहिजे.

उदा. राज्यपालांचे, मुख्यमंत्र्यांचा, तुम्हांला, आपणास, शिक्षकांना, अध्यक्षांचे.

## नियम :–४

१.वरील नियमव्यतिरिक्त कोणत्याही कारणासाठी व्युत्पत्तीने सिद्ध होणारे व न होणारे अनुस्वार देऊ नयेत.

या नियमानुसार ‘ घरे , पांच, कारणें, काळीं, नांव, कां, कांच, जो, घरीं’ हे

शब्द ‘घरे, पाच, कारणे, काळी, नाव, का, काच, जो, घरी’ असे लिहावेत.

२. अनुस्वारसदृश चिन्ह ;

नपुंसकलिंगी अन्त्यस्थानीच्या एकराचे उच्चारीत भाषेमध्ये ‘अ’ कारान्त रुपातंर होते. हा अ’ कार लेखनात अनुस्वार चिन्हाने किंवा बिंदूने (.) दाखविले जातो. लेखनात पात्राच्या किंवा वक्त्याच्या तोंडी बोलण्याची भाषा घालावी लागते. त्यावेळीही ते असे लिहावे उदा. तुझे –तुझं, केले-केलं, असे-असं, खरेंच- खरंच.

## 2. ह्रस्व दीर्घ

**नियम :– ५**

१. एकाक्षरी शब्दातील इ-कार किंवा ऊ-कार दीर्घ उच्चारला जातो म्हणून तो दीर्घ लिहावा.
उदा. : मी, ही, तू, धु, जू, ऊ, ती, जी, पी, बि, पू, रु.
'ही' हे अव्ययसुद्धा दीर्घन्त लिहावे. उदा. असेही म्हणता येते. सुधाही गावाला गेली.
' तु, ती, ही, जी' या एकाक्षरी दीर्घान्त सर्वनामांना विभक्तिप्रत्यय लावल्यासाठी यांची सामान्यरूपे करताना यांतील अन्त्य स्वर व्हस्व होतो. जसे –तुला, तिने, हिचा, जिची. मात्र 'स' आणि 'ते' हे दोन विभक्तीप्रत्ययलावताना अन्त्य स्वर दीर्घच राहतो.जसे –तूस, तीत, हिस, जिस/

२. मराठीतील तत्सम ई-कारान्त आणि ऊ-कारान्त शब्द दीर्घान्त लिहावेत.
उदा : कवि- कवी, बुद्धि- बुद्धी, गति-गती.
इतर मराठी शब्दांचा अंती येणारा इकार व उकार दीर्घ लिहावा.
उदा. पाटी, जादू, पैलू.

३. 'आदी' व इत्यादी' ही विशेषणही दीर्घान्त लिहावीत.
' परंतु, यथामति, तथापि ही तत्सम अव्यये र्हस्वान्त लिहावीत.

४. व्यक्तीनामे, ग्रंथनामे, शीर्षक व सुटे ह्रस्वान्त तत्सम शब्द मराठीत दीर्घान्त लिहावेत.
उदा. हरी, मनुस्मुर्ती, वर्गीकरण पद्धती, कुलगुरू मात्र ' आणि ' व ' नी' ही मराठीतील दोन अव्ययेदेखील ह्रस्वान्त लिहावीत.

५. ईय, इक, इत इत्यादी प्रत्ययांनी साधलेले शब्द-
- संस्कृत ईय- प्रत्ययसाधित शब्द दीर्घ लिहावा.
उदा. राजकीय, प्रशासकीय, भारतीय, राष्ट्रीय, शास्त्रीय.
- संस्कृत ईक प्रत्ययसाधित शब्द ह्रस्व लिहावा.
उदा. सामाजिक मौलिक, शारीरिक, लौकिक.
- मराठी ईक-प्रत्यययुक्त शब्द दीर्घ लिहावा.
उदा. खर्चिक, पडीक.
संस्कृत इत - प्रत्ययसाधित शब्द दीर्घ लिहावा.
उदा. चकचकीत, लखलखीत.
- अनीय- प्रत्यय : हा प्रत्यय तत्सम शब्दांना लागतो.
उदा. पूजनीय, माननीय, प्रेक्षणीय, रमणीय.
- इष्णू- प्रत्यय : हा प्रत्यय तत्सम शब्दांना लागतो.
उदा. जयिष्णू, वर्धिष्णू,सहिष्णू.

६.
सामासिक शब्द लिहिताना समासाचे पूर्वपद (पहिला शब्द ) तत्सम ह्रस्वान्त शब्द असेल ( म्हणजे मुळात संस्कृतात ह्रस्वान्त असेल ) तर ते पूर्वपद ह्रस्वान्त लिहावे.दीर्घान्त असेल तर ते दीर्घान्त लिहावे.
उदा. बुद्धी –बुद्धीवैभव; लक्ष्मी –लक्ष्मीपुत्र.

## नियम :- ६

१.मराठी शब्दातील शेवटचे अक्षर दीर्घ असेल तर त्यातील उपान्त्य इकार किंवा उकार व्हस्व असतो.

उदा. किडा, विळी, पिसू, मारुती,सुरु, हुतुतू.

२. तत्सम शब्दातील शेवटचे अक्षर दीर्घ असेल तरी त्यातील उपान्त्य इकार किंवा उकार मूळ संस्कृतातप्रमाणे हस्व किंवा दीर्घ ठेवावा.

उदा. नीती, अतिथी, प्रीती, गुरु, शिशु, समिती.

**नियम :– ७**

१. मराठी आकारान्त शब्दांतील उपान्त्य इकार व उकार दीर्घ लिहावेत.
 उदा. गरीब, वकील, सून,फुल बहिण,खीर तूप.

२. तत्सम शब्दातील शेवटचे अक्षर अकारान्त असले तरी त्यातील उपान्त्य इकार किंवा उकार मूळ संस्कृतातल्याप्रमाणे ह्रस्व किंवा दीर्घ ठेवावा. उदा.– गुण, गीत, विष, शरीर, रसिक, शूर, शूल, कौतुक

३. मराठी शब्दातील जोडाक्षरापूर्वीचे इकार व उकार ह्रस्व असतात. उदा. कुस्ती, मुक्काम, पुष्कळ, शिस्त, दुष्काळ,, पुस्तक. मात्र तत्सम शब्दांतील जोडाक्षरापूर्वीचे इकार व उकार ह्रस्व व दीर्घ अशा दोन्ही प्रकारांनी आढळतात ते मूळ संस्कृतप्रमाणेच लिहावेत.
 उदा. मित्र, पुण्य, तीक्ष्ण, पूज्य , चरित्र, प्रतीक्षा.

४. मराठी व तत्सम शब्दांतील इकारयुक्त व उकारयुक्त अक्षरांवर अनुस्वार असल्यास ती अक्षरे सामान्यत : ह्रस्व असतात.

५. उदा. चिंच, लिंब तुरुंग, उंच, लिंग, बिंदु, अरविंद, अरुंधती. मराठी व तत्सम शब्दांतील विसर्गापूर्वी इकार व उकार सामान्यत: ह्रस्व असतात.
 उदा. छि, थु:, दु:ख, नि:शस्त्र.

**नियम :- ८**

१. उपान्त्य दीर्घ ई-ऊ असलेल्या मराठी शब्दांचा उपान्त्य ई-कार किंवा ऊ-कार उभयवचनी सामान्यरूपाच्या वेळी ह्स्व लिहावा.
उदाहरणार्थ : गरीब – गरिबाला, गरिबांना , चूल – चुलीला, चुलींना
अपवाद- दीर्घोपान्त्य तत्सम शब्द.
उदा. परीक्षा – परीक्षेला, परीक्षांना ; दूत – दूतांना

२. मराठी शब्द तीन अक्षरी असून त्याचे पहिले अक्षर दीर्घ असेल तर अशा शब्दाच्या सामान्यरूपात उपान्त्य ई-ऊ त्यांची जागी 'अ' आल्याचे दिसते.
उदा. बेरीज – बेरजेला, बेरजांना; लाकूड – लाकडाला, लाकडांना. मात्र पहिले अक्षर ह्स्व असल्यास हा 'अ' – आदेश विकल्पाने होतो.
उदा. परीट – परीटास, परीटांना / परटांना.

३. शब्दाचे उपान्त्य अक्षर 'ई' किंवा 'ऊ' असेल तर अशा शब्दाच्या उभयवचनी सामान्यरुपी वेळी 'ई' च्या जागी 'य' आणि 'ऊ' च्या जागी 'व' असे आदेश होतात.
उदा. काईल- कायलीला, कायलींना ; देऊळ – देवळाला; देवळांना.

४. पुल्लिंगी शब्दाच्या शेवटी 'सा' असल्यास त्या जागी उभयवचनी सामान्यरूपाच्या वेळी 'शा' होतो ('श्या' होत नाही) उदा. – घसा घश्याला ससा सशांना

५. पुल्लिंगी शब्दाच्या शेवटी 'जा' असल्यास उभयवचनी सामान्यरूपात तो तसाच राहतो ( त्याच्या 'ज्या' होत नाही.)
उदा. दरवाजा – दरवाजाला, दरवाजांना ; मोजा – मोजाला , मोजांना.

६. तीन अक्षरी शब्दातील मधले अक्षर 'क' चे किंवा 'प' चे व्दित्व असेल तर उभयवचनी सामान्यरूपाच्या वेळी अनुस्वारविरहीत होते.
उदा. रक्कम – रकमेला, रकमांना; छप्पर – छपराला, छपरांना.

७ मधल्या 'म' पूर्वीचे अनुस्वारसहित अक्षर उभयवचनी सामान्यरूपाच्या वेळी अनुस्वारविरहीत होते.
उदा. किंमत – किंमतिला, किंमतींना ; गंमत –गमतीला, गमतीचा.

८. ऊ-कारान्त विशेषनामाचे सामान्यरूप होत नाही.
उदा. गणू – गणूस ; दिनू- दिनूला.

९ धातूला 'ऊ' आणि 'ऊन' प्रत्यय लावताना धातूच्या शेवटी 'व' असेल तरच 'वू' आणि 'वून' अशी रूपे होतात, पण धातूच्या शेवटी 'व' नसेल तर 'ऊ'' आणि 'ऊन' अशी रूपे होतात.
उदा. धाव – धावू, धावून; ठेव – ठेवू, ठेवून; गा – गाऊ, गाऊन; धू – धुऊ, धुऊन; कर- करू, करून; हस-हसू, हसून.

**नियम – ९**

पूर हा ग्रामवाचक शब्द कोणत्याही ग्रामनामास लावताना त्यातील 'पू' दीर्घ लिहावा.
उदा. नागपूर, तारापूर, सोलापूर.

**नियम – १०**

एकारान्त नामाचे सामान्यरूप या – कारान्त करावे.
उदा. करणे – करण्यासाठी, फडके – फडक्यांना.
अशा रुपांऐवजी ' करणेसाठी, फडकेंना' अशी एकारान्त सामान्यरूपे करू नयेत.